2018 IV 09 | 0930 | Seat No. :

Time : 1½ Hours

**SOCIAL SCIENCE – II (M)**
**(Geography and Economics)**

**Subject Code**

| S | 0 | 1 | 2 | B |
|---|---|---|---|---|

**Total No. of Questions : 4** **(Printed Pages : 4)** **Maximum Marks : 40**

***सूचना :*** *१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.*
*२) प्रश्न पत्रिकेत **चार** मुख्य प्रश्न आहेत.*
*३) **प्रत्येक** प्रश्नाचे उत्तर **नवीन** पानावर लिहा.*
*४) **उजवीकडील** अंक पूर्ण **गुण** दर्शवितात.*
*५) प्रत्येक प्रश्नाचा क्रमांक व उपक्रमांक **स्पष्टपणे** लिहीणे आवश्यक आहे.*

१. अ) खालील प्रश्नांखाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा.

१) खालीलपैकी कोणत्या महत्वाच्या कारणामुळे ओरिसामधील जमिनीचे अवमूल्यन झाले आहे ? **[½]**

अ) अति गुरे चराई ब) अति जल सिंचन

क) खाणकामा मुळे झालेली जंगलतोड ड) संपूर्णपणे उपजिविकेची शेती

२) खालीलपैकी कोणत्या राज्यात भरपूर जलसंपत्ती आहे पण पायाभूत सुविधांचा विकास झालेला नाही ? **[½]**

अ) पंजाब ब) अरुणाचल प्रदेश

क) आंध्र प्रदेश ड) उत्तर प्रदेश

ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **१५** शब्दांपर्यंत लिहा. **[2]**

१) पठारी प्रदेशाचे आर्थिक महत्त्व लिहा.

२) वसाहतींच्या कालखंडात भारतीय जंगलांना मोठी हानी पोहोचविणाऱ्या कोणत्याही दोन घटना लिहा.

क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २० ते ३० शब्दांपर्यंत लिहा. **[4]**

१) साधनसंपत्तीचा वाटेल तसा वापर केल्यामुळे कोणत्या मोठ्या समस्या निर्माण झाल्या ?

२) जंगलांच्या विनाशांचा पुरुषांपेक्षा स्त्रियांवर अधिक परिणाम कसा झाला आहे ?

ड) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा. **[3]**

१) जलसंपत्तीचे संवर्धन आणि व्यवस्थापन करणे का गरजेचे आहे ?

२) भारतातील विविध भागांत पर्जन्य जलसंधारण कसे केले जाते ते उदाहरणासहित स्पष्ट करा.

२. अ) खाली **'अ'** गटात पीके आणि **'ब'** गटात सर्वाधिक उत्पादन करणारी राज्ये दिलेली आहेत. त्यांच्या योग्य जोड्या जुळवून लिहा. **[1]**

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| १) शेंगदाणे | अ) पंजाब |
| २) बाजरी | ब) राजस्थान |
| | क) मध्य प्रदेश |
| | ड) आंध्र प्रदेश |

ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येका १५ शब्दांपर्यंत लिहा. **[2]**

१) भारतात अनेक प्रकारच्या खाद्य पिके आणि अखाद्य पिकांची लागवड का केली जाते ?

२) खाणकामाची ''मृत्यूचे द्वार'' म्हणून असलेली ओळख नष्ट करण्यासाठी काय करणे गरजेचे आहे ?

क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी २० ते ३० शब्दांपर्यंत लिहा. **[4]**

१) पारंपारिक आणि अपारंपारिक ऊर्जास्रोतांमधील फरकाचे दोन मुद्दे लिहा.

२) भारतात पेट्रोलियम हा महत्वाचा ऊर्जा स्रोत का आहे ?

ड) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा. **[3]**

१) प्राचीन उपजीविकेच्या शेतीची वैशिष्ट्ये लिहा.

२) आज शेतकरी कृषी क्षेत्रामधील गुंतवणूक का काढून घेऊ लागले आहेत ?

३. अ) खालील प्रश्नांखाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा.

१) खालीलपैकी कोणते बंदर स्वातंत्र्यानंतर मुंबई बंदरावरचा भार कमी व्हावा या हेतूने विकसित केले गेले ? [½]

अ) पॅरादिप ब) कोची क) कांडला ड) तुतीकोरिन

२) खालीलपैकी कोणता उद्योग हा कृषी आधारित उद्योग आहे ? [½]

अ) साखर ब) मोटार उद्योग क) लोह-पोलाद ड) ॲल्युमिनीअम

ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **१५** शब्दांपर्यंत लिहा. [3]

१) लोह-पोलाद उद्योगाला पायाभूत उद्योग असे का म्हटले आहे ?

२) जलवाहतूकीचे महत्त्व लिहा.

३) व्यापाराचे अयोग्य संतुलन म्हणजे काय ?

क) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **२०** ते **३०** शब्दांपर्यंत लिहा. [4]

१) गोव्यामधील रस्ते वाहतूकीला कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते ?

२) गोड्या पाण्याचे कारखान्यांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी कोणतेही दोन उपाय लिहा.

ड) तुम्हाला पुरवलेल्या भारताच्या नकाशात खालील बाबी दाखवा. तुम्ही वापरलेल्या चिन्हांची सूची तयार करा. [2]

१) छत्तीसगड मधील भिलाई लोह-पोलाद कारखाना.

२) जम्मू आणि काश्मीर मधील श्रीनगर लोकर उद्योग कारखाना.

३) आंध्र प्रदेश मधील विशाखापट्टणम् बंदर.

४) राजस्थानमधील जयपूर माहिती तंत्रज्ञान पार्क.

४. अ) खालील प्रश्नांखाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा.

१) खालीलपैकी कोणत्या राज्याचा बालमृत्यूदर सर्वात कमी आहे ? [½]

अ) केरळ ब) बिहार

क) गुजरात ड) मध्य प्रदेश

२) खालीलपैकी देशाच्या विकासाची तुलना करण्यासाठी सर्वात महत्वाचा निकष कोणता ? [½]

अ) आरोग्य ब) खेळ क) लोकसंख्या ड) उत्पन्न

ब) खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **१५** शब्दांपर्यंत लिहा. **[3]**

१) सरासरी उत्पन्न म्हणजे काय ?

२) बँका त्यांच्या ठेवींपैकी अतिशय कमी रक्कम स्वत:कडे रोख स्वरूपात का ठेवतात ?

३) रीतसर क्षेत्रातील आर्थिक व्यवहारांवर कोणती संस्था देखरेख ठेवते ?

क) खालील कोणत्याही **दोन** प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी **२०** ते **३०** शब्दांपर्यंत लिहा. **[4]**

१) बाजारपेठेत कोणकोणत्या प्रकारे ग्राहकांचे शोषण केले जाते ?

२) भारतामध्ये जागतिकीकरणाचे कोणते चांगले परिणाम झाले ?

३) लोक संघटित क्षेत्रात काम करणे का पसंत करतात ?

ड) खालील तक्त्यांत गोव्याच्या विविध भागातील (जनगणना 2011) झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांची माहिती दिलेली आहे. त्याचा अभ्यास करून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

| **क्रमांक** | **विभाग** | **झोपडपट्टीची संख्या** | **झोपडपट्टीतील लोकसंख्या** |
|---|---|---|---|
| 1 | फोंडा | 258 | 981 |
| 2 | वास्को | 4,974 | 23,625 |
| 3 | मडगाव | 265 | 1,641 |

१) गोव्याच्या कोणत्या विभागात सर्वात जास्त झोपडपट्ट्या आहेत ? **[1]**

२) मडगाव पेक्षा फोंडा झोपडपट्टीची लोकसंख्या कितीने कमी आहे ? **[1]**